VOL- VII ISSUE- VII JULY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयातून प्रतीत होणारे मूल्यशिक्षणविषयक विचार एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. किरण शिवाजीराव पाईकराव**
एम.ए.मराठी, इतिहास,समाजषास्त्र
एम. एड.,सेट,पीएच.डी.
प्र. प्राचार्य
सरस्वती अध्यापक महाविद्यालय किनवट

**प्रस्तावना :**

मूल्यशिक्षणाशिवाय शिक्षणास महत्व नाही कारण मूल्याशिवाय शिक्षणास पूर्णत्व येणे शक्य नाही. शिक्षणातून व्यक्तीचे व्यक्तीमत्त्व फुलत जाते ते योग्य दिशेने फुलविण्यासाठी सदाचरण, समता, न्याय, दया, क्षमा, शांती, करूणा, शील अशा अनेक नैतिक मूल्याची आवश्यकता असते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे मूल्यशिक्षण विषयक विचार हे आजही महत्त्वपूर्ण आहेत. व ते विचार त्यांनी लिहिलेल्या विविध वाड्मयीन कृतीतून दिसून येतात. त्याचाच प्रस्तुत संशोधनात संशोधकाने शैक्षणिक दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे.

**संशोधनाची गरज : —**

"गरज ही शोधाची जननी आहे" कोणतेही संशोधन हे निश्चित हेतू डोळयासमोर ठेवून केले जाते. व त्याची निर्मिती ही गरजेतून होते. प्रस्तुत संशोधनाची सुध्दा एक विशिष्ट गरज आहे ती म्हणजे सावित्रीबाई फुले यांच्या व्यक्तिमत्वाचा एक पैलू समोर आणणे तो म्हणजे त्यांचे कवयित्रीपण होय . कारण त्यांचे वाङमय हे आजही दुर्लक्षित आहे व त्यावर संशोधन होणे काळाची गरज आहे.

**संशोधनाचे महत्व :—**

सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयात अनेक नैतिक मूल्यांचा अंतर्भाव दिसून येतो. या मूल्यांचा शोध घेऊन त्यांचा शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे व सद्यस्थितीनुरूप त्याच्या प्रत्यक्ष अवंलब करण्यात प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व आहे.

**समस्याविधान :—**

"क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयातून प्रतीत होणारे मुल्यशिक्षणविषयक विचार —एक चिकित्सक अभ्यास "

**समस्याविधानातील परिभाषिक संज्ञाच्या व्याख्या :—**

**१. संकल्पनात्मक व्याख्या :—**

डॉ.आर.एन. शर्मा " जेंव्हा स्त्री प्रथा,श्रध्दा, सवयी व वर्तन पध्दतीत एकाएकी आमलाग्र बदल होतो तेंव्हा त्यास क्रांती असे म्हणतात. "

(संदर्भ :— भारतीय समाजशास्त्र , ए. एम. गायकवाड पृ. क्र.१४३ )

**२. कार्यात्मक व्याख्या :—**

"समाजात शिघ्रगतीने फार मोठया प्रमाणात होणारा बदल म्हणजे क्रांती होय. "

**३. वाङमय : —**

**अ.संकल्पनात्मक व्याख्या :—**

"एखाद्या व्यक्तीने विशिष्ट हेतूसाठी निर्माण केलेली लिखित कलाकृती म्हणजे वाङमय होय"(संदर्भ : डॉ. लिला गोविलकर प्रथमावृत्ती (२००३), भारतीय साहित्य विचार', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे पृ. क्र. १७)

**ब.कार्यात्मक व्याख्या :—** वाणीने युक्त ते वाङमय "

"वाङमय म्हणजे साहित्य होय. उदा.कथा कांदबरी , नाटक,कविता, इत्यादी कृतीस वाङमय असे संबोधतात. "

**क.शिक्षण संकल्पनात्मक व्याख्या :—**

इंग्रजीत शिक्षणाला म्कनबंजपवद हा पर्यायी शब्द आहे. हा शब्द मकनबंतम या शब्दापासून आला त्याचा अर्थ जव इतपदह वनज ए जव कमअमसवच बाहेर काढणे असा होतो ( संदर्भ :— एस. आर. प्रभुदेसाई नवीन स्टॅडर्ड डिक्शनरी आवृत्ती चौथी २००२ नवनीत प्रकाशन, गुजरात पृ. क्र १७२)

**ड.कार्यात्मक व्याख्या**

१. "मानवाला मानवाची जाणीव करुन देणे तेच खरे शिक्षण "
२. "व्यक्तीच्या व्यक्तीच्या वर्तनातील सुयोग्य बदल म्हणजे शिक्षण"

**इ. मूल्यशिक्षण :— संकल्पनात्मक व्याख्या**

**१.हेन्री ज्युल्स :—**

" ज्या बाबीला आपण चांगले समजतो. त्या बाबीचे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण" (संदर्भ डॉ. मुळावकर मूल्यशिक्षण सुसंवाद,२००५ विद्या प्रकाशन,नागपूर पृ क्र ८३)

**उ. कार्यात्मक व्याख्या :—**

स्वांतत्र्य, समता, बंधुता, न्याय, दया क्षमा, करुणा इ. अशा अनेक मूल्यांचे व्यक्तीवर्तनात सुधारणा करण्यासाठी दिले जाणारे शिक्षण म्हणजे मूल्य शिक्षण होय.

**ऊ. विचार:— संकल्पनात्मक व्याख्या :—**

१. " Thought the Act or process of thinking –" (संदर्भ नवनीत स्टॅंडर्ड डिक्शनरी, नवनीत प्रकाशन पृ क्र ५६५)
२. **जेम्स रॅास:—**"अनुभवाची ज्ञानात्मक बाजू म्हणजे विचार"
३. **कार्यात्मक व्याख्या** "अडचणी सोडविण्यासाठी, केलेली मानसिक कृती म्हणजे विचार होय"

**संशोधनाचे उदिष्टये :—**

१. सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयाचा चिकित्सक अभ्यास करणे.
२. सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयातील शिक्षण विषयक मूल्यांचा शोध घेणे
३. शैक्षणिक दृष्टीकोनातून त्यांच्या मूल्यांचे सद्यस्थितीतील महत्व स्पष्ट करणे.
४. सावित्रीबाई फुलेंच्या मूल्य शिक्षणविषयक विचारासंबंधी शिफारशी सुचविणे

**संशोधनाचे गृहितके :—**

१. सावित्रीबाई फुले यांचे वाङमय क्षेत्रात योगदान आहे.
२. सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयात शैक्षणिक मूल्य आढळतात.
३. त्यांच्या वाङमयातून प्रतीत होणारे मूल्य सद्यस्थितीत उपयुक्त आहेत.

**संशोधनाची व्याप्ती :—**

प्रस्तुत संशोधनाच्या व्याप्तीमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार शैक्षणिक कार्य , सामाजिक कार्य, त्यांचे स्त्री मुक्तीचे कार्य, सामाजिक परिवर्तनातील योगदान इ. सर्व विषयांचा समावेश संशोधनाच्या व्याप्ती होतो.

**संशोधनाची मर्यादा :—** प्रस्तुत संशोधनामध्ये सवित्रीबाई फुले यांच्या वाङमयातून प्रतित होणारे केवळ शिक्षण विषयक मूल्यांचाच अभ्यास केला आहे.

१. प्रस्तुत संशोधनात सावित्रीबाई यांच्या केवळ उपलब्ध वाङमयाचाच समावेश केला आहे.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे तसेच माहीती संकलनासाठी मुलाखत या संशोधन साधनाचा वापर केला आहे.

**संशोधनाची साधने :—**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधकाने प्राथमिक व दुयम स्त्रोत या साधनांचा वापर केला आहे.

**अ. प्राथमिक स्त्रोत :—**

यामध्ये स्वत: सावित्रीबाई फुले यांनी लिहिलेल्या पुस्तकांचा, काव्याचा व त्यांनी दिलेल्या विविध भाषणांचा, ज्योतिबा फुले यांना लिहिलेल्या विविध पत्रांचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने उपलब्ध झालेल्या खालील ग्रंथाचा प्राथमिक स्त्रोत म्हणुन वापर केला आहे.

१. सावित्रीबाई ज्योतिराव फुले, १८५४ 'काव्यफुले' शिलाप्रेस प्रकाशन पुणे
२. सावित्रीबाई ज्योतिराव फुले, १८९२ ' बावन्नकशी सुबोध रत्नाकर ' मिशनरी प्रिंटींग प्रेस,पुणे

**ब.दुययम स्त्रोत :—**

दुयम स्त्रोतामध्ये सावित्रीबाई फुले यांच्यावर इतरांनी लिहिलेल्या ग्रंथाचा पुस्तकांचा , वर्तमानपत्राचा , साप्ताहिक, मासिके , विविध लेख , विचारंवताच्या भाषणाचा वापर केला गेला.

**माहीतीचे विश्लेषण :—**

प्रस्तुत संशोधनाची ध्दती ही 'ऐतिहासिक संशोधन पध्दती' असल्यामूळे प्राथमिक व दुयम स्त्रोताच्या आधारे संकलित केलेल्या माहीतीचे विश्लेषण संशोधकाने गुणात्मक पध्दतीने केले आहे तसेच तज्ज्ञांच्या मुलाखतीचें विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी या संख्याशास्त्रीय परिमाणाचा वापर केला आहे.

**संशोधनाची कार्यपध्दती : —**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाचा अर्थ, शैक्षणिक संशोधन, शैक्षणिक संशोधनाच्या विविध पध्दतीची संक्षिप्त माहिती व ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अर्थ, वैशिष्टये, गरज, व महत्व, व प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेली कार्यपध्दती याविषयी सविस्तर माहीती दिली आहे. प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

**संकलित महितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनकाचे प्राथमिक व दुयम स्त्रोता आधारे व मुलाखत या साधनाद्वारे संकलित केलेल्या

महितीचे संशोधनाच्या उद्दिष्टानुरूप विश्लेषण व अर्थनिवर्चन केले आहे. संकलित महितीचे विश्लेषण संख्यात्मक व गुणात्मक पध्दतीने केले आहे. त्याअधारे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**संशोधनाचे सारांश व निष्कर्ष :**

संशोधकाचे शेवटच्या या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधनाचा सारांश व प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष मांडले आहेत. व सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयातील मुल्यशिक्षण विषयक शिफारशी सुचविल्या आहेत. त्या पढील प्रमाणे

**उद्दिष्ट क्र १ सवित्रीबाई फुले यांच्या वाङमयाचा चिकित्सक अभ्यास करणे चे निष्कर्ष**

१. सावित्रीबाई फुले यांनी वाङमयची रचना केली आहे.
२. सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयामध्ये काव्यफुले , बावन्नकशी, सुबोध रत्नाकर इ सावित्रीबाई जोतीबांना लिहिलेली पत्रे , मातुश्री सावित्रीबाईची भाषणे व गाणी , जोतिबांची भाषणे व शिव महिम्नस्त्रोत्र इ. वाङमयाचा समावेश होतो.
३. उपरोक्त सर्व वाङमय हे सावित्रीबाई फुले हे वाङमय स्वलिखित आहेत.

**उद्दिष्ट क्र.२ सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयातील शिक्षण विषयक मूल्यांचा शोध घेणे**

१. सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयात विविध मूल्य आढळतात.
२. या मूल्यांची मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने सामाजिक, धार्मिक , आर्थिक, शैक्षणिक , राजकीय, पर्यावरणीय अशा विविध प्रकारात मांडणी करता येते.
३. सावित्रीबाई फुले यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पुरस्कार केला आहे.

**उद्दिष्ट्ये क्र ३ शैक्षणिक दृष्टीकोनातून त्यांच्या यांचे सद्यस्थितीतील महत्व स्पष्ट कारणे**

सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयातील मूल्य शिक्षणाचे सद्यस्थितीमध्ये व्यक्ती, समाज, व राष्ट्रांच्या जडण घडतील अनन्यसाधारण असे महत्व आहे.

१. सद्यस्थितीमध्ये पर्यावरणीय सावित्रीबाई फुले यांच्या मूल्यांचे महत्व आहे
२. शिक्षणातून व्यक्तीमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोनाची रूजवणुक होण्यासाठी व अंधश्रध्देचा नाश व्हावा यासाठी महत्व आहे
३. अधुनिक काळात इंग्रजी शिक्षणाचे महत्व लक्षात घेता सावित्रीबाई यांच्या वाङमयात सुध्दा इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार केलेला आढळतो
४. सावित्रीबाईच्या मते " शिक्षणातून व्यक्तीमध्ये स्वावलंबन या मूल्याचा विकास झाला."

**तज्ज्ञांचा मुलाखतीवरुन प्राप्त निष्कर्ष :–**

१. सावित्रीबाई फुले यांनी काव्य फुले, बावन्नकशी, सुबोध रत्नाकर , सावित्रीबाईनी जोतीबांना लिहीलेली पत्रे , मातुश्री सावित्रीबाई भाषणे, व गाणी ज्योतिबांनी भाषणे व शिव मम्निस्त्रोत इ वाङमयची रचना केली.
२. सावित्रीबाई फुले यांचे वाङमय क्रांतीकारी, शाश्वत , मानवतावादी , वास्तववादी मुल्यधिष्ठित , प्रबोधनात्मक जीवनाभिमूख व परिवर्तनशील अशा स्वरुपाचे वाङमय आहे.
३. सावित्रीबाई फुले यांच्या वाङमय स्वांतत्र, बंधुता, न्याय , वैज्ञानिकता, कृतीशिलता, त्याग, शौर्य, अशा विविध मूल्यांचा पुरस्कार केला आहेत्र

**संशोधन शिफारसी**

**अ.अभ्यासक्रम मंडळासाठी शिफारशी**

१. सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयाचा विविध स्तरावरील अभ्यासक्रमात समावेश करावा.
२. काव्यफुले हा काव्यसंग्रह पदवी व पदव्युत्तर स्तरावरील पाठयक्रमात असावा.
३. शालेय स्तरावर सावित्रीबाईच्या काव्यातील एखादी कविता, सावित्रीबाईचे पत्र इ चा क्रमिक पुस्तकांत समावेश करावा.

**ब. शिक्षकांसाठी शिफारसशी**

१. सावित्रीबाई फुले यांच्या मूल्यशिक्षण विषयक विचारांचा प्रचार, प्रसार करावा.
२. सावित्रीबाई फुले यांच्या मुल्यांचे शैक्षणिक योगदानाचा विद्यार्थ्यास परिचय करुन द्यावा.
३. शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले यांच्या वरील कार्यक्रम घेण्यास पुढाकार घ्यावा.

**क. विद्यापीठ , शाळा व महाविद्यालयांसाठी शिफारशी**

१. सावित्रीबाई फुले समग्र वाङमय यावर चर्चासत्र , परिषद यांचे आयोजन करावे.
२. सावित्रीबाई फुले वाङमय व मूल्यशिक्षण यावर वादविवाद स्पर्धांचे आयोजन करावे.
३. सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयाचा प्रचार व प्रसार करावा.

**मुलाखतीनुसार शिफारशी**

१. सावित्रीबाई फुले यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू जसे कवयित्री, शैक्षणिक कार्य, विचार , सामाजिक

VOL- VII ISSUE- VII JULY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

सुधारणा, एक शिक्षिका, मुख्याध्यापीक इ वर शिक्षणसंस्था शासनसंस्था नी प्रकाश टाकावा.

२. सावित्रीबाई फुले यांच्या संमग्र वाङमयाचा प्रचार व प्रसार करावा

३. सावित्रीबाई फुले यांच्या वाङमयील मूल्यांचा शोध घ्यावा.

**संदर्भ ग्रंथ**

१. प्रा.डी. एकनाथ ना गावंडे / प्रा. सौ. वर्षा शरद झोबाडे 'मूल्यधिष्ठीत शिक्षण' निर्मल प्रकाशन , भूमिपूत्र, अमरावती प्रथम आवृत्ती २००००

२. मुळावकर डॉ. संतोष डॉ./ कल्पना : मूल्यशिक्षण सुसंवाद ; विद्या प्रकाशन, नागपूर ४ ऑक्टोबर२००५, प्रथमावृत्ती , पृ.४५७.

३. माळी डॉ. मा. गो. क्रांतीज्योति सावित्रीबाई जोतिराव फुले , मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे ऑगस्ट २०१२,चौथी आवृत्ती , पृ १९९